# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष ६ | अंक २ | सप्टेंबर २०२३ | मूल्य ₹ १०० | AED 10 | USD 2 | www.panthastha.com

चलनाच्या डिजिटल अवमूल्यनाचा सिद्धांत



Petition to Government of India

विजिगीषु वृत्ती एक सामाजिक चिंतन




परदेशी विद्यापीठांचा भारतात प्रवेश



डॉ. ज्ञानेश्वर म. मुले
सदस्य
*Dr. Dnyaneshwar M. Mulay*
*Member*

राष्ट्रीय मानव अधिकार आयोग
मानव अधिकार भवन, सी-ब्लॉक,
जीपीओ कम्प्लेक्स, आईएनए, नई दिल्ली-110 023 भारत
**NATIONAL HUMAN RIGHTS COMMISSION**
Manav Adhikar Bhawan, C-Block
GPO Complex, INA, New Delhi-110 023 India

D.O .No.99/03/2023/M(DMM)

Date: 23rd March, 2023

Dear Dr. Sandeep Kadwe,

I thank you for sending me the issues of 'VISHWA PANTHASTHA' - the first Marathi magazine for Non-Resident Indians. Please accept my hearty congratulations for this pioneering effort of keeping updated the Non-Resident Indians about Indian main stream developments which might interest them. Also this is perhaps the first effort by anyone in the regional languages that goes beyond English and Hindi.

As the number of Overseas Indians grows, it is important that magazine like yours works as a bridge to connect the dots and filling the Overseas Indians with news, information and initiatives of the Central and State Governments. The information that you have provided is of direct relevance not only to NRIs, but also to those Indians who wish to stay in touch with the latest news of our NRI brothers and sisters.

I have no doubt that as the time passes your magazine will be read by larger number of people both in India and abroad.

My best wishes in your journey.

Yours sincerely,

Regards,

**(Dr. Dnyaneshwar M. Mulay)**

**Dr. Sandeep Vasantrao Kadwe**
Editor- Vishwa Panthastha
A-703, Nisarga City-2
Kaspate Vasti, Wakad
Pune-411 057, Maharashtra
E mail: editor@panthastha.com

# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

# अनुक्रमणिका


- संपादकीय - विजिगीषु वृत्ती अर्थात जगण्याची उमेद - एक सामाजिक चिंतन ४
- चलनाच्या डिजिटल अवमूल्यनाचा सिद्धांत ७
- परदेशी विद्यापीठांमुळे शैक्षणिक क्षेत्रात निकोप स्पर्धा व गुणात्मक वाढ व्हावी १०
- Petition to recognize contributions of Indian Tax Payers, Voters, NRIs १३



एक समाजचिंतन
वर्ष ६ अंक २
सप्टेंबर २०२३

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

संपादकीय व वितरण साहाय्य
राजन ताबडे, अबू धाबी
धवल नांदेडकर, फुजेरा
वीरभद्र कारेगावकर, अजमान
नितीन गायकवाड, औरंगाबाद

मुखपृष्ठ आणि सजावट
विश्व पांथस्थ

मूल्य ₹ 100 | AED 10 | US$2

**Vishwa Panthastha**
**Year 6 Issue 2**
**September 2023**

First Marathi Monthly For NRIs

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Editorial & Distribution Support
Rajan Tawde. Abu Dhabi
Dhawal Nandedkar, Fujerah
Veerbhadra Karegaonkar, Ajman
NitinGaikwad-Aurangbad

Cover & Design
VISHWA PANTHASTHA

Price ₹ 100 | AED 10 | US$2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए-७०३, निसर्ग सिटी -२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे - ४११०५७. येथे प्रसिध्द केले.
**संपादक - संदीप वसंतराव कडवे**
**(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)**

Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe. and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)



या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय



## विजिगीषु वृत्ती अर्थात जगण्याची उमेद - एक समाजचिंतन

विजिगीषा म्हणजे विजय मिळवण्याची इच्छा. विजिगीषु वृत्ती जगण्यासाठी आवश्यक आहे. विजय नक्की कशावर मिळवायचा ? स्वतःवर विजय मिळवायचा. स्वतःच्या कमतरतेवर, न्यूनगंडावर, आळसावर, अपात्रतेवर, विजय मिळवायचा. कुणाला हरवण्यासाठी नाही तर स्वतःला सिद्ध करण्यासाठी व काहीतरी चांगले साध्य करण्यासाठी विजय मिळवायचा. दैनंदिन जीवनात येणाऱ्या सर्व अडचणींवर विजय मिळवायचा. छोट्या छोट्या गोष्टींवर विजय मिळवावा लागतो तेव्हा मोठा विजय मिळतो. म्हणजे मोठा जॉब मिळवायचा असेल तर सर्वप्रथम त्या जॉब साठी आवश्यक असणारी डिग्री मिळवावी लागते, फक्त डिग्री नाही तर खरोखरच त्या विषयाचे ज्ञान मिळवावे लागते. छोटी छोटी कामे करून अनुभव वृद्धिंगत करावा लागतो. पण ते पुरेसे नाही. त्या ज्ञानाचा व अनुभवाचा वापर करून दैनंदिन जीवनात समस्या सोडवता येतात का याचा विचार करावा लागतो व त्याप्रमाणे कृती करावी लागते. कृती करण्यासाठी संसाधने लागतात, आयुध लागतात, मानसिक व शारीरिक बळ लागते. सगळ्यात महत्वाचे म्हणजे काय साध्य व सिद्ध करायचे आहे याची स्पष्ट कल्पना असावी लागते. त्या दिशेने सतत प्रयत्न करावा लागतो. त्या प्रयत्नांची मूळ शक्ती म्हणजे विजिगिषु वृत्ती.

विजिगिषु वृत्ती हरवत चालली आहे. परिणामी जगण्याची उमेद कमी होत चालली आहे. शेतकऱ्यांची, बेरोजगार, अर्धरोजगार व विषमरोजगारी नवयुवकांची विजिगीषा, दिशा व दशा परिस्थितीनुसार धूसर होत चालली आहे. असे चालणार नाही. पिढ्या येतात व जातात. पण चांगले ते टिकले पाहिजे. निसर्ग टिकला पाहिजे, समाज चालत राहिला पाहिजे. अखंड, अविरत. निसर्गाचे व समाजाचे परस्परावलंबित्व मनापासून स्विकारले तर परस्परांबद्दलचा आदर निर्माण होतो, स्वकेंद्रित स्वार्थी प्रवृत्ती नष्ट होते. एका पिढीने दुसऱ्या पिढीला वारसात काय द्यावे हे जर मला विचाराल तर त्यात विजिगिषु वृत्ती सर्वप्रथम द्यावी असेच सांगेन. सर्वप्रथम स्वतःला सांभाळण्याची, सावरण्याची व सकारात्मक विचार करण्याची जाणीव व समज द्यावी. दुर्दम्य इच्छाशक्ती, आशावाद आणि नवनिर्माण करण्याची प्रचंड शक्ती द्यावी. त्यासाठी लागणारे अर्थसहाय्य स्वतःजवळ असेल तर व जमले तर द्यावेच परंतु, त्याशिवाय देखील अनेक संसाधने लागतात ती जमेल तशी उपलब्ध करून द्यावी. अक्षय व अक्षर असे काहीच नाही, त्यामुळे जे आपल्याकडे आहे त्याचे मोल जाणून ते सांभाळण्याची संवेदनशीलता, वाढवण्याची क्षमता, जबाबदारीची जाणीव व नवनिर्माणाची स्फुर्ती द्यावी. अडचणींना सामोरे जाण्याची व त्यावर मात करून जगण्याची उमेद द्यावी. विजिगिषु वृत्ती द्यावी.

सर्वसाधारण भारतीय हा उत्सवी आहे. त्याला घरात खायला अन्न नसेल, अंगावर धड कापड नसेल, कदाचित कर्ज असेल, कदाचित स्वतःच्या भविष्याची चिंता सतावत असेल, कुटुंबाची व आसपासची परिस्थिती हाताबाहेर चालली असेल, पण सण साजरे करायला त्याला आवडते. मोठे शोध भारतीयांच्या नावावर नाही, मोठ्या जागतिक कंपन्या भारतीयांच्या नाही, उद्योग धंद्यात यशस्वी होण्यासाठी लागणारी चिकाटी नाही, फक्त नोकरी करण्यात धन्यता मानणारे भारतीय व अनिवासी भारतीय

उत्सवासाठी व झालेच तर आरक्षणासाठी आंदोलने वगैरेसाठी मात्र प्रचंड वेळ पैसे शक्ती खर्च करतात. यातून काय विधायक कार्य घडते तेपण कळत नाही. भारतात सरकारी नोकऱ्या कंत्राटी होत आहेत, आहे त्याच सरकारी नोकरांना पगार व पेन्शन देण्यासाठी सरकार कर्ज काढते आहे, मग आरक्षणात नोकरी कधी मिळणार? शिक्षणासाठी आरक्षण समजू शकते, पण आरक्षण नोकरीत हवे, शिक्षणात नाही.

अनिवासी भारतीय जेव्हा परदेशात स्थलांतर करतात तेव्हा त्यांच्यात करो वा मरो हि जाणीव तयार होते. तिथे भारतासारखे आरक्षण नसते. तिथे राहण्यासदेखील व्हिसा, स्पॉन्सरशिप, इतर खर्च वगैरे द्यावेच लागतात. तेव्हा मात्र विजिगीषा प्रचंड जागृत होते. भारतात आरक्षणासाठी आंदोलने करणारे तिकडे गेले कि निमूट संघर्ष करतात, आपल्या बुध्दितमत्तेच्या, कर्तृत्वाच्या जोरावर समृद्धी मिळवतात, नाव कमावतात. मग भारतातच एवढी आंदोलने का होतात?

अनेक भारतीय कॅनडा येथे स्थलांतरित होतात. शिक्षणासाठी जातात, नोकरीसाठी जातात, मजुरीसाठी जातात, मोजकेच काही बिझनेससाठी जातात. काही अभिनेते केवळ टॅक्स वाचवण्यासाठी कॅनडाचे नागरिक झालेले आपणास माहित आहे. कॅनडामध्ये बहुसंख्येने पंजाबी भारतीय आहेत, त्याखालोखाल बहुदा गुजराथी मग इतर भारतीय आहेत. मराठीदेखील भरपूर आहेत. आखातातून अनेक भारतीय फक्त भारतात यायचे नाही व इतर कुठल्यातरी देशाचे नागरिकत्व घ्यावे म्हणूनही व अमेरिकेच्या जवळ म्हणूनही कॅनडाचे नागरिकत्व घेतात. कॅनडाच्या पासपोर्टवर जगातल्या अनेक देशात व्हिसाशिवाय अथवा ऑन अरायव्हल व्हिसा मिळतो, शिक्षण फुकट आहे, सोशल बेनेफिट्स मिळतात, वगैरे अनेक आमिषे असतात. पण तिथे गेल्यावर खरी परिस्थिती कळते.

आकारमानाच्या दृष्टीने कॅनडा जगातील दुसरा मोठा देश असेल, पण कठीण नैसर्गिक भौगोलिक परिस्थितीमुळे या देशाची लोकसंख्या केवळ ४ करोड च्या आसपास आहे. कॅनडाचे १३ प्रोव्हिन्स आहेत व हा देश फ्रेंच ब्रिटिश यांच्या वसाहतीतून निर्माण झाला आहे. या देशात ब्रिटिशांची आहे तशी राजेशाही व लोकशाही आहे. ओटावा राजधानी आहे, टोरोंटो आँटेरियो (५९ लाख लोकसंख्या), मौंट्रीअल क्युबेक (३९ लाख लोकसंख्या), व्हॅन्कुव्हर ब्रिटिश कोलंबिया (२५ लाख लोकसंख्या) आणि ओटावा आँटेरियो (१३ लाख लोकसंख्या) अशी मोठी शहरे आहेत. यातील मुख्य लोकसंख्या हि दक्षिणेकडे एकवटलेली आहे, अमेरिकेला जवळ म्हणून. सध्या भारताचे व कॅनडाचे राजकीय संबंध ताणले गेले आहेत. कॅनडामधून खलिस्तानवादी कार्यरत आहेत व त्यांना प्रतिबंध करण्यासाठी कॅनडा फार काही करत नाही असा भारताचा आरोप आहे. विदेश मंत्री जयशंकर यांनी तर कॅनडाच्या भारतीय वकिलातीला दबावाचा सामना करावा लागतो असे स्पष्टच सांगून टाकले आहे.

अशा परिस्थितीत अनिवासी भारतीय कॅनडात कसे राहत असतील, याचा विचार केला. अल्बर्टा या प्रोव्हिन्स मध्ये कॅलगरी नावाचे शहर आहे. तिथे बहुसंख्येने भारतीय आहेत व कमी खर्चात तिथे राहता येते म्हणून अनेक भारतीय कॅलगरीला राहण्यास जातात. अर्थात तिथे त्यांना हवा तसा रोजगार मिळेलच याची खात्री नाहीच, पण किमान कॅनडात राहता येऊन पाच वर्षे पूर्ण करता येतील या आशेवर अनेक भारतीय तिकडे राहतात.

विश्व पांथस्थ तर्फे कॅनडा मधील कॅलगरी येथील भारतीयांसाठी सोशल मीडिया फेसबुकवर एक सर्व्हे (पोल) घेण्यात आला. त्यात प्रश्न विचारण्यात आला कि तुमची मासिक बचत किती होते? त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. ३१४ वोट पडले. त्यात ६४% म्हणजे २०१ लोकांनी सांगितले कि त्यांची बचत म्हणजे खर्च वजा जाऊन होणारी बचत हि शून्य किंवा उणे आहे. म्हणजे ते क्रेडिट कार्ड किंवा इतर मदतीवर तेथे जगत आहेत. यात नावावरून तरी पंजाबी मते जास्त होती, त्या खालोखाल उत्तर भारतीय व नंतर इतर भारतीय (बंगाली ओरिसा देखील) मते आढळून आली. काहींनी सांगितले कि ते वडिलांच्या पैश्यावर जगात आहेत. म्हणजे ते शिक्षणासाठी तेथे गेले असावेत. १७% टक्के म्हणजे ५२ लोकांनी सांगितले कि ते २००० कॅनेडियन डॉलर्स इतके सेविंग महिन्याला करतात. जी चांगली गोष्ट आहे. २००० डॉलर्स ते ५००० डॉलर्स महिन्याला सेव्ह करणारी फक्त ५% म्हणजे १९ लोक होती, त्यात पंजाबी, गुजराती, दाक्षिणात्य सर्व नावे होती. योगेश पाटील हे मराठी नाव देखील त्यात होते हि अभिमानाची बाब आहे. फेसबुक माहिती नुसार, योगेश पाटील यांचे शिक्षण जळगाव येथे झाले आहे व ते अल्बर्टा येथे राहतात असे दिसले.

महिन्याला ५००० डॉलर्स पेक्षा जास्त सेविंग करणारे ७% म्हणजे २१ लोकं आढळली. बहुतेक पंजाबी नावे होती. या सर्वे नुसार खालील निरीक्षणे नोंदवता येतील.

१. जे दरमहा ५००० पेक्षा जास्त बचत करत आहेत ते बहुतेक स्वतःचा व्यवसाय चालवत आहेत किंवा कदाचित CXO पदावर काम करत असतील. कदाचित स्वतःच्याच कंपनीचे सिइओ असतील. श्रीमंत होण्याचा मार्ग म्हणून तुम्ही उद्योजकतेचा प्रयत्न करू शकता. हे खूप कठोर परिश्रमाचे काम आहे, परंतु ते योग्य आहे.
२. जे २k ते ५k पेक्षा जास्त बचत करत आहेत ते कदाचित व्यापारी किंवा स्वयंरोजगार बनण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे असे म्हणता येईल कि, तुमची मूळ क्षमता, तुमचे पदवी शिक्षण किंवा व्हिसा श्रेणी यावर लक्ष केंद्रित करा आणि त्या विभागात काम करण्याचा प्रयत्न करा. तुम्ही शेवटी त्यातच तुम्ही मोठे व्हाल, कारण समाजासाठी ही सेवा गरजेची व आवश्यक असेल.
३. जे २k पेक्षा कमी बचत करत आहेत ते देखील खूप चांगले करत आहेत. ते किमान बचत करतात आणि कर्जात नाहीत. ती खूप चांगली उपलब्धी आहे. त्यांनी निर्धाराने काम करत राहावे आणि पुढील टप्पा म्हणून म्हणून स्वयंरोजगाराचा प्रयत्न करावा.
४. नकारात्मक किंवा शून्य बचत करणारे लोक, यांनी त्यांच्या पर्यायांचे पुनर्मूल्यांकन करावे. जर तुम्ही कॅनडामध्ये शिकत असाल, तर हे समजण्यासारखे आहे की हा तुमचा तात्पुरता टप्पा आहे, परंतु जे आपल्या कुटुंबाच्या बचतीतून खर्च करत आहेत किंवा एखाद्याच्या आर्थिक मदतीवर जगत आहेत, त्यांनी नोकरी, क्षेत्र, प्रदेश बदलण्याचा प्रयत्न करा. तुमचे पहिले उद्दिष्ट टिकून राहणे हे आहे, आम्हाला माहित आहे, परंतु तुम्हाला श्रमिक किंवा कर्मचार्यांची गरज कुठे आहे हे देखील शोधावे लागेल आणि स्वतः ला उच्च कौशल्य प्राप्त करून पुन्हा प्रशिक्षित करावे लागेल. तुम्हाला खूप खूप शुभेच्छा. अनुदान आणि सामाजिक लाभ तुम्हाला केवळ अल्प मुदतीसाठी टिकून राहण्यास मदत करू शकतात. एकटे बसू नका, नैराश्यात जाऊ नका. चेहऱ्यावर हसू ठेवून मेहनत करत राहा.

कॅनडामध्ये रोजगाराची संधी कशी आहे असाही एक पोल अक्षय गुलाटी नावाच्या तरुणाने चालवला, त्याला ७५% लोकांनी वाईट असे मत दिले. एव्हढे सगळे वाईट असेल तर भारतासारखी सुंदर मायभूमी व संपन्न देश सोडून भारतीय कॅनडात का जात असतील? भारतात रंगवले जाणारे विकासाचे चित्र केवळ आभासी तर नाही? मग हेच अनिवासी भारतीय आपले पंतप्रधान तिकडे गेले तर उत्सव का साजरे करतात, वरून भारताला व भारतातील यंत्रणेला का नावे ठेवतात? कुठेतरी काहीतरी विसंगती नक्कीच आहे.

सध्या महाराष्ट्रात, भारतातच नव्हे तर परदेशातही ढोल ताशा पथके तयार झाली आहेत. शेकडोच्या संख्येने शिकले सावरलेले भारतीय ढोल ताशा वाजवत जर्मनी, अमेरिका, युके, जपान, दुबई, अशा अनेक ठिकाणी सार्वजनिरीत्या मिरवणूक काढतात व उत्सव साजरा करतात. भारतात असतांना कदाचित सोसायटीच्या गणपतीला देखील न जाणारे परदेशात गेले कि उत्सव साजरे करतात. नारायण पेठ, सदाशिवपेठ, पुणे, मुंबई व इतर शहरात राहणारे नागरिक प्रचंड ध्वनिप्रदूषणामुळे व उत्सवाच्या नावाखाली चालणाऱ्या छचोरगिरीला कंटाळले आहेत व प्रचंड विरोध करू लागले आहेत. काही दिवसांनी परदेशातदेखील इतर नागरिकांकडून असा विरोध सुरु झाला तर आश्चर्य वाटायला नको. अनिवासी भारतीयांनी आपल्या वेळेची, संधीची व आसपासच्या लोकांची जाणीव ठेवून आपली प्राथमिकता पुन्हा पुन्हा तपासून पाहावी व आपण कशासाठी भारताबाहेर स्थलांतरित झालो याची स्वतःशीच पुन्हा पुन्हा शहनिशा करायला हवी असे या निमित्ताने सांगावेसे वाटते.

आम्ही सर्वांना, सर्व अनिवासी भारतीयांना, शुभेच्छा देतो, प्रत्येकजण मौल्यवान आणि महत्त्वपूर्ण आहे. तुम्ही श्रीमंत किंवा गरीब असलात तरी, आमची विनंती आहे की मानवी मूल्यांचा, चांगल्या तत्त्वांचा आदर करा आणि आनंद पसरवा. जे आपण देतो ते कुठून तरी परत आपल्याकडे येते, म्हणून केवळ चांगल्याची व आनंदाची निर्मिती करा.

नवरात्रीच्या निमित्ताने शक्तीची उपासना करतांना सर्व सज्जनांची विजिगीषा जागृत व्हावी हीच शुभेच्छा !!

**डॉ. संदीप कडवे**

**विश्व पांथस्थ, १५ सप्टेंबर २०२३, पुणे**

# चलनाच्या डिजिटल अवमूल्यनाचा सिद्धांत :- डॉ संदीप कडवे

जागतिक स्तरावर, रोख-आधारित व्यवहारांपासून दूर जाण्याचा ट्रेंड आहे. उदाहरणार्थ, केनियामध्ये २०१३ पर्यंत त्या देशाच्या एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) किमान २५% रकमेच्या व्यवहारांसाठी मोबाइल पेमेंटचा वाटा होता. यूएसमध्ये, क्रेडिट कार्ड अनेक दशकांपासून प्रचलित आहेत, अगदी लहान पेमेंटसाठीही. भारततही, क्रेडिट आणि डेबिट कार्डचा वापर आणि इलेक्ट्रॉनिक पेमेंट (नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर, किंवा एनईएफटी, किंवा रिअल टाइम ग्रॉस सेटलमेंट, किंवा आरटीजीएस, प्रणालीद्वारे) वाढत आहेत. आता तर डिजिटल सेटलमेंट रिअल टाइम बेसिस वर होऊ लागली आहे व २४ तास १२ महिने हि सुविधा चालू आहे. बँकेच्या मोठ्या व्यवहारापासूनअगदी भाजीवाल्याकडे देखील आपण पेटीएम भीम वगैरे वापरून अगदी १० वीस रुपयाचे देखील पेमेंट करतो. फिनटेक कंपन्यांचा यात मोठा वाटा आहे. एका रिसर्च नुसार, मूल्याच्या दृष्टीने, भारतातील डिजिटल पेमेंट मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत, FY२१ मध्ये ३०.१९% वाढले. आधार पेमेंट ब्रिज सिस्टीम (PBS), सरकारी वितरणासाठी क्रेडिट व्यवहारांसाठी वापरल्या जाणार्याम यंत्रणेने व्हॉल्यूमच्या बाबतीत स्थिरता दर्शविली, परंतु २०१९ च्या तुलनेत मूल्यात २४% वाढ झाली. डिजिटल व्यवहारांच्या एकूण व्हॉल्यूममध्ये UPI व्यवहारांचे प्रमाण २३% वरून वाढले २०१८-१९ मध्ये ५१% ते २०२०-२१ मध्ये, नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर (NEFT) व्यवहारांचे प्रमाण १०% वरून ७% पर्यंत कमी झाले.

२०२०-२१ मध्ये UPI साठी व्यवहारांचे सरासरी मूल्य ₹१,८३८ आणि NEFT साठी ₹८१,२५६ होते, हे दर्शवते की UPI लहान-मूल्याच्या डिजिटल व्यवहारांच्या वाढीला चालना देत आहे.

डिजिटल पेमेंटमध्ये २०२०-२१ मध्ये २२% ची वाढ नोंदवली गेली आहे जी मागील वर्षातील ३२% वाढीपेक्षा जास्त आहे. पेटीएम ची एका सेकंदाला ३000 ट्रांसकशन्स हाताळण्याची क्षमता आहे. एका वर्षात सात बिलियन पेक्षा जास्त ट्रांसकशन्स एकट्या पेटीएममधून केले गेले. CLS.३०-डिसेंबर-२०२१ च्या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२१ मधील ३00 अब्जच्या तुलनेत भारतातील डिजिटल पेमेंटचे मूल्य २०२६ पर्यंत तीन पटीने वाढून १ ट्रिलियनपर्यंत पोहोचेल.

..... आणि या १ ट्रिलियन डॉलर वर एक पर्सेंट ट्रांसकशन कॉस्ट ग्राहकाने एकदाच दिली असे गृहीत धरले तर याचे बाजार मूल्य १० बिलियन डॉलर्स म्हणजे भारतीय चलनात ₹७६२,५७,0९,२0,000 म्हणजे ७६,२५७ कोटी रुपये इतकी असेल. हि रक्कम कोण कमावते हा वेगळा प्रश्न आहे. पण आजचा विषय डिजिटल देवाणघेवाणीत डिजिटल चलनाचे होणारे अवमूल्यन असे आहे. अगदी थोडक्यात सांगायचे झाले तर २०२६ पर्यंत जर एका वर्षात एक ट्रिलियन डॉलर्स इतके डिजिटल ट्रांसकशन्स झाले व त्यावर एक पर्सेंट कॉस्ट ग्राहकाने (बायर किंवा सेलर) दिली तर बाजारातून त्या एका वर्षात ७६,२५७ कोटी रुपयाचा घसारा झाला असेल. म्हणजे २०२२ पासून २०२६ पर्यंत कदाचित दोन लाख कोटी रुपयांचा घसारा झाला असेल. याहून महत्वाचे म्हणजे गेल्या चार वर्षात म्हणजे २०१७ पासून पुढे २०२१ शेवट पर्यंत केवळ डिजिटल घसार्यापोटी पन्नास हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम ग्राहकाच्या खिशातून व अर्थव्यवस्थेतून गायब झाली असा याचा अर्थ असेल.

हा सिद्धांत नगदी चलन (म्हणजे पेपर वर छापलेले किंवा कॉइन च्या स्वरूपात असलेले चलन) विरुद्ध डिजिटल चलन याच्या बाजारातील विनिमयाच्या तुलनेवर आधारित आहे. हा सिद्धांत सांगतो कि डिजिटल चलनाचे अवमूल्यन होते. मी डॉलर अथवा इतर चलनाचा तुलनेत रुपयाच्या अवमूल्यनाबद्दल बोलत नाही आहे, मी हे सिद्ध करत आहे की, रुपयाचे चलन, जेव्हा डिजिटली व्यापार केला जातो, तेव्हा अवमूल्यन होते, शेवटी अमुक एका हस्तांतरणानंतर चलन संपूर्ण मूल्य गमावते. पूर्वीच्या अर्थव्यवस्थेत असे होत नसे.

विश्वास ठेवायला कठीण आहे परंतु आपण या ठिकाणी याच सिद्धांताची चर्चा करणार आहोत. मी चलनी नोटांच्या हस्तांतरणाचा दर आणि चलनी नोटांच्या शेल्फ लाइफवर एक छोटेसे संशोधन केले.

तुमच्या खिशातून फक्त १०० रुपये, ५० रुपये, २० रुपये आणि १० रुपये काढा. नोटेवर आर बी आय च्या गव्हर्नर ची स्वाक्षरी पहा. जितक्या जुन्या गव्हर्नरची स्वाक्षरी तेव्हढी जुनी ती नोट किंवा त्या नोटेचे आयुष्य.

डॉ. सी रंगराजन - २२-१२-१९९२ ते २१-११-१९९७ (२७ वर्षे)
डॉ. बिमल जालान - २२-११-१९९७ ते ०६-०९-२००३ (२२ वर्षे)
डॉ. वाय व्ही रेड्डी - ०६-०९-२००३ ते ०५-०९-२००८ (१८ वर्षे)
डॉ. डी. सुब्बाराव - ०५-०९-२००८ ते ०४-०९-१३ (११ वर्षे)
डॉ. रघुराम राजन - ०४-०९-२०१३ ते ०४-०९-२०१६ (६ वर्षे)
डॉ. उर्जित आर. पटेल - ०४-०९-२०१६ ते ११-१२-२०१८ (३ वर्षे वय)
श्री. शक्तिकांता दास - १२-१२-२०१८ ते आजपर्यंत (५ वर्ष जुने)

माझ्याकडे असलेली सर्वात जुनी नोट म्हणजे डी सुब्बाराव यांच्या स्वाक्षरीची १०/- रुपयांची नोट. त्यामुळे त्या नोटेचे आजपर्यंतचे आयुष्य ११ वर्षांचे. हि नोट आठवड्यातून फक्त एकदा एका माणसाने दुसऱ्या माणसाला दिली असे गृहीत धरू. असे गृहीत धरले तर वर्षातून ५२ वेळा म्हणजे ११ वर्षात या नोटेचे किमान ५७२ वेळा हस्तांतरण झाले, चलनवलन झाले. कदाचित त्याहून अधिक वेळा नोटेचे हस्तांतरण झाले असेल. त्याला अजून सरासरी ५ वर्षांचे आयुष्य आहे असे गृहीत धरले तर १० रुपयांची नोट तिच्या संपूर्ण आयुष्यात ८३२ वेळा बदलली जाते. परंतु १० रुपयांचे विनिमय मूल्य मात्र कायम आहे व सोळा वर्षांपूर्वी नोट छापली म्हणून आज त्याचे विनिमय मूल्य कमी होत नाही. येथे महागाईचा विचार करू नका, म्हणजे स्टँड अलोन एक्सचेंज व्हॅल्यूमध्ये कोणताही घसारा नाही. आणि अर्थातच, आरबीआयही चलनी नोट बाजारातून कधीही मागे घेऊ शकते व तरीही सेटलमेंट मध्ये त्याचे मूल्य तेच दर्शनी मूल्य असेल. पण न छापण्याचा, वितरित करण्याचा, सेटलमेंट करण्याचा, बदलण्याचा वगैरे खर्च आजपर्यंत आरबीआय व बँकिंग सिस्टीम देत होती. आता तो खर्च डिजिटल करन्सी साठी ग्राहक देत आहे असे दिसते.

असे गृहीत धरा की आम्ही PayTM[2] किंवा PhonePay वर ८३२ वेळा डिजिटली १०/- चे चलन मूल्य पाठवतो आणि प्रत्येक वेळी पेमेंट गेटवेवर १% (किमान) दिले जाते, तर आम्ही १०० वेळा देवाण घेवाण केल्यावर एक्सचेंजमध्ये १० रुपयांचे मूल्य पूर्णपणे कमी करू. वर सांगितल्याप्रमाणे एका वर्षात सरासरी ५२ वेळा म्हणजे दोन वर्षांत १०४ वेळा हस्तांतरण झाले असे गृहीत धरले तर माझ्या बँक ताळेबंदात दहा रुपयाच्या नोटसमोर प्रत्येक वेळी एक पर्सेंट वजावट करून शून्य मूल्याची दहा रुपयाची नोट राहील. दोन वर्षानंतर आपण १०/- च्या काल्पनिक चलनात व्यवहार करू जे अस्तित्वात नसेल, दुसऱ्या वर्षानंतर. त्यामुळे उर्वरित १४ वर्षांचा कालावधी किंवा ७२८ एक्सचेंजेस आपण काल्पनिक चलनात व्यवहार करू जे अस्तित्वातच नसेल. बाजारात या आभासी चलनाची किंमत आपण कशी काढणार? म्हणजे आपल्या बँक बॅलन्स मध्ये ट्रान्झॅक्शन कॉस्ट मुळे घट होतच राहील, जी पूर्वीच्या आरबीआय प्रणालीमध्ये ग्राहकाच्या माथी मारली जात नव्हती. .

हा पैसा जातो कुठे? सेवा पुरवठादारांना? म्हणजे पेटीएम, वगैरे नवीन फिनटेक कंपन्यांना? हे नवीन आभासी चलन आहे का? जरी डिजिटल व्यवहाराची किंमत ०.१% किंवा ०.०१% केली गेली, तरीही ग्राहकांसाठी घसारा कायम राहील. म्हणजे या डिजिटल जगात हरवलेले चलनाची व्याप्ती तुमच्या लक्षात येईल.
हे आकडे चकित करणारे आहेत. वापरात असलेल्या डिजिटल चलनाशी (बँक बॅलन्स जरी जुळत असले तरीही) कोणत्याही वेळी आरबीआय या आकड्यांचा ताळमेळ कसा साधत असेल याची मला कल्पना नाही. परंतु देवाणघेवाणीचे मूल्य कमी होण्याचा निव्वळ दर धक्कादायक आहे.

मी इरोशन किंवा डिजिटल डेप्रिसिएशन ऑफ करन्सी ही संकल्पना आणखी स्पष्ट करू. जेव्हा एखादी चलनी नोट जारी केली जाते तेव्हा ती आरबीआय गव्हर्नरच्या वचनासह छापली जाते की मी वाहकाला या चलनाचे मूल्य देण्याचे वचन देतो. ११ वर्षांनंतरही, मी नोट RBI किंवा बँकेला परत करतो, तरीही मला तीच किंमत मिळते. RBI माझ्याकडून चलन छापणे, प्रसारित करणे, संचयित करणे, रक्कम वजा करणे आणि उर्वरित रक्कम भरणे यासाठी शुल्क आकारत नाही. त्यामुळे हार्ड करन्सी ची कोणतीही झीज होत नाही, अवमूल्यन होत नाही. डिजिटल देवाणघेवाण/व्यवहारात नेमके हेच अवमूल्यन होत आहे. जेव्हा ग्राहक चलनाचा व्यवहार करत असतो, तेव्हा तो या व्यवहारासाठी किंमत किंवा शुल्क भरत असतो, प्रत्येक वेळी चलनाची डिजिटल देवाणघेवाण होते. ते डिजिटल अवमूल्यन आहे. अर्थव्यवस्थेसाठी ही संकल्पना घातक आहे.

तसे, प्रत्येक वेळी जेव्हा डिजिटल चलनाची देवाणघेवाण होते, तेव्हा बँकेत साठवलेल्या कायदेशीर टेंडरचा पाठिंबा मिळणे अपेक्षित असते. म्हणजे रुपयाच्या मागे सोने वगैरेच्या मूल्याचा पाठिंबा असतो. आपण मोबाईल वर बँकेतून पेयमेन्ट करतो तेव्हा

बँकेतील बॅलन्स उपलब्ध असेल तरच वापरकर्ता डिजिटल पद्धतीने पैशांची देवाणघेवाण करू शकतो. म्हणून, नोट किंवा हार्ड चलन बँक खात्यात (शेवटी बँकेच्या किंवा शेवटी आरबीआयच्या ताब्यात) राहिल्यावर, प्रत्येक वेळी डिजिटल व्यवहार होत असताना, प्रत्यक्षात मात्र बाजारात डिजिटल घसारा होतो.

चलन हे विनिमयाचे माध्यम आहे. मग ते डिजिटल असो वा मुद्रित किंवा नाणे. त्याचे मूल्य, RBI किंवा सर्वोच्च बँकेने वचन दिल्याप्रमाणे, सेंट्रल बँकेच्या ट्रेझरीमध्ये परत येईपर्यंत त्याचे मूल्य कधीही घसरणार नाही असेच अर्थव्यवस्थेत अपेक्षित आहे. RBI किंवा मध्यवर्ती बँक मुद्रण, सुरक्षित ठेवणे, साठवणूक, हस्तांतरण, चलन परत करणे आणि जुने चलन नष्ट करणे यासाठी वापरकर्त्याकडून शुल्क आकारत नाही. हा खर्च आरबीआयने त्याच्या पी अँड एल आणि बॅलन्स शीटमध्ये घेतला आहे. RBI देखील मन मानेल त्याप्रमाणे बँक नोट छापून जारी करू शकत नाही, त्यांना सोन्याच्या किंवा इतर मानकांच्या समान मूल्यासह ते सिद्ध करावे लागेल. तसेच ते मॉनिटरी पॉलिसीत बसले पाहिजे. कारण प्रमाणापेक्षा जास्त चलन अर्थव्यवस्थेत चालनफुगवटा निर्माण करते व त्यामुळे अर्थव्यवस्था कोसळते. अनेक आफ्रिकन व इतर देश या चलनफुगवट्यामुळे दिवाळखोर झाले आहेत.

चलन हे सार्वभौम प्राधिकरणाचे चिन्ह आहे, आणि म्हणूनच भारतात बिटकॉईन किंवा क्रिप्टो करन्सी स्वरूपात डिजिटल चलन छापण्यास विरोध केला आहे. म्हणूनच Bitcoins क्रिप्टोकारांशी हे भारतातील अवैध चलन आहे. हे आभासी चलन भारताच्या सार्वभौमतेला आव्हान देते. परंतु डिजिटल इंडियाशी सुसंगत व क्रिप्टोकरंसीला पर्याय म्हणून यानंतर आरबीआय डिजिटल करन्सी इशू केली आहे.

चलनाच्या डिजिटल अवमूल्यनाचा हा सिद्धांत घाबरावणारा आहे. सध्याच्या चलनाच्या घसाराला व्यवहाराची किंमत असे लेबल केले आहे. त्यामुळे स्पष्ट लाभार्थी बँका, पेमेंट सेवा प्रदाते, फिनटेक कंपन्या आहेत. भविष्य डिजिटल व्यवहारांचे आहे यात शंका नाही. तथापि, चलनाचे डिजिटल घसारा या स्वरूपातील ही त्रुटी प्रणालीमधून काढून टाकली जाईल, ग्राहकाला याचा भुर्दंड बसणार नाही याची काळजी मॉनिटरी पॉलिसी तज्ञ, सेंट्रल बँक ऑथॉरिटीज रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी घ्यावी आणि प्रतिसाद द्यावा अशी माझी अपेक्षा आहे.

**डॉ. संदीप कडवे, विश्व पांथस्थ**
**एप्रिल २०२२**

# ताजा कलम

देशातील युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) प्लॅटफॉर्मवरील व्यवहारांची संख्या सप्टेंबरमध्ये वार्षिक ५६ टक्क्यांनी वाढून १०.६ अब्जांवर गेली आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या (एनपीसीआय) ताज्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. सलग दुसऱ्या महिन्यात यूपीआय व्यवहारांनी १० अब्जांचा टप्पा ओलांडला आहे. तरीही ऑगस्टच्या तुलनेत व्यवहारांमध्ये मोठी वाढ झालेली नाही. सप्टेंबरमध्ये ऑगस्टच्या तुलनेत एक दिवस कमी असतो. त्यामुळे व्यवहारांच्या संख्येत मोठी वाढ दिसून येत नाही. ऑगस्टमध्ये व्यवहारांच्या संख्येत वार्षिक ६१ टक्के वाढ झाली होती. त्यानुसार, सरासरी दररोज ३५ कोटी ८१ लाख व्यवहार होतात. सप्टेंबरमध्ये या व्यवहारांमध्ये झालेल्या उलाढालीचे मूल्य १५.८ लाख कोटी रूपये असून, त्यात वार्षिक ४२ टक्के वाढ झाली आहे. ऑगस्टमधील व्यवहारांचे मूल्य १५.७६ लाख कोटी रूपये होते.

ऑगस्टपर्यंत, फोनपेने जवळपास पाच अब्ज व्यवहार केले. त्याचे मूल्य ७.८ लाख कोटी रूपये आहे. बाजारपेठेतील एकूण व्यवहारांच्या ४७ टक्के इतके हे प्रमाण आहे. तर मूल्याच्या दृष्टीने ४९ टक्के आहे. गुगलपेने ३.८ अब्ज, तर पेटीएमने १.५ अब्ज व्यवहार केले. गुगलपेने ५.४ लाख कोटी रूपयांचे व्यवहार केले, तर पेटीएमने १.८ लाख कोटी रूपयांचे व्यवहार केले.ग्रामीण भारतात यूपीआयचा वापर वाढत असून, व्यक्ती ते व्यापारी अशा व्यवहारांचे प्रमाण सर्वाधिक आहे.व्यापाऱ्यांना शून्य व्यवहार शुल्क लागू करण्यात आल्याने या व्यवहारांना प्रोत्साहन देत आहेत. त्याचप्रमाणेव्यापारी सुरक्षितता, वेळेवर पेमेंट याचाही सकारात्मक परिणाम झाल्याचे वर्ल्डलाइन इंडियाने ताज्या अहवालात म्हटले आहे.

**सप्टेंबर २०२३**

# परदेशी विद्यापीठांमुळे शैक्षणिक क्षेत्रात निकोप स्पर्धा व गुणात्मक वाढ व्हावी - डॉ संदीप कडवे, इन्क्युबेट पार्टनर्स, पुणे.

दुबईतील दुबई इंटरनेट सिटी, दुबई अकॅडेमिक सिटी ची स्थापना व वाढ दुबईत २०००-२०१९ पर्यंत मी जवळून बघीतली. मिटकॉन इंटरनॅशनल व नॉलेज पार्टनर्स या दुबईतील माझ्या दोन्ही संस्थांचा दुबई इंटरनेट सिटी, दुबई अकॅडेमिक सिटी, यु ए ई तील विविध कंपन्या व विविध विद्यापीठे यांच्याशी नेहमी संपर्क असे. इन्क्युबेट पार्टनर्स या पुण्यातील माझ्या कंपनीतर्फेदेखील भारतातील अनेक युनिव्हर्सिटीज, कॉलेजेस यांच्याशी सतत संपर्क असतो. २००२-२००३ साली आय आय टी, मुंबई चा कॅम्पस दुबईमध्ये स्थापित करावा असा विचार केला व त्या संदर्भात अमेरिकेतील उद्योजक कंवल रेखी यांच्याशी चर्चा झाली. नंतर आय आय टी मुंबई च्या व्यवस्थापनशी देखील चर्चा झाली. त्या काळी आय आय टी चे संपूर्ण नियंत्रण हे केंद्र सरकारच्या. ताब्यात असल्याने अनेक परवानग्या, पॉलिसी अशा प्रस्तावाच्या आड येत होत्या त्यामुळे आय टी चा कॅम्पस परदेशात सेटअप करणे हे शक्य झाली नाही. आजहि आयटी चा कॅम्पस परदेशात स्थापित केलेला नाही. परंतु आता आय आयटी स्वायत्त संस्था झाली आहे व अनेक आयआयटीअन्सनि आयटीतील भरीव आर्थिक मदत केली आहे. आय आय टी ही भारतातील अग्रगण्य व सर्वोकृष्ट दर्जाची शैक्षणिक संस्था मानली जाते. त्यांनादेखील परदेशात कॅम्पस स्थापित करण्यासाठी आजही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यातुलनेत दुबईमध्ये अकादमिक सिटीमध्ये, अबू धाबी मध्ये तसेच रस अल खेमाँ सारख्या ठिकाणीदेखील अनेक खासगी विद्यापीठांनी आपला कॅम्पस दशकांपूर्वीच स्थापित केलेला आहे. त्याचा त्यांना फायदा झालेला आहे. पुणे युनिव्हर्सिटीने असा कॅम्पस स्थापित करण्यासाठी २००९-२०११ दरम्यान प्रयत्न केला तो विफल झाला. माझ्या दुबईतील कंपनीतर्फे आम्ही पुण्यातील एका खासगी विद्यापीठाशी करार करून परदेशी विद्यार्थ्यांना भारतात शिक्षणासाठी आणण्यासाठी देखील प्रयत्न केले. हा प्रयत्न देखील फारसा फलद्रूप झाला नाही. याचे कारण परदेशी विद्यार्थ्यांना परदेशातील अनेक नामवंत विद्यापीठांमध्ये जाऊन शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होती व अजूनही आहे. त्यातुलनेत. भारतात येऊन. भारतातील विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे. यासाठी. त्यांना. कुठले आकर्षण होते किंवा आहे? कमी खर्च हे एक आकर्षण असेल व सुरक्षितता हे दुसरे असेल. परंतु करियरचा व पदवीनंतर मिळणाऱ्या नोकरीचा विचार करता बहुतांशी भारतीय व परदेशी विद्यार्थी आजही यूएस, जर्मनी, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, कॅनडा या देशांमध्ये जाऊन पदवी, पदव्युत्तर, फेलोशिप व डॉक्टरल शिक्षण घेणे जास्त पसंत करतात. त्यासाठी लागणारा खर्च देखील उचलण्याची तयारी ते स्वतः व त्यांचे पालक दाखवतात. याचे अजून एक महत्वाचे कारण म्हणजे डिग्री घेतल्यानंतर परदेशात जॉब मिळतो व कालांतराने परदेशी नागरिकत्व देखील मिळते. त्यायोगे हे विद्यार्थी परदेशी सेटल होतात.

परदेशी विद्यापीठांना भारतात कॅम्पस सेटअप करण्यासाठी नुकतीच परवानगी देण्यात आलेली आहे. प्रथमदर्शनी ही परवानगी एकतर्फी दिलेली दिसते म्हणजे रेसिप्रोकल बेसिसवर ही परवानगी दिलेली दिसत नाही. म्हणजे भारतातील विद्यापीठांना परदेशात कॅम्पस सेट अप करण्यासाठी जे देश परवानगी देतील त्याच देशांच्या विद्यापीठांना व कॉलेजस ना भारतात कॅम्पस स्थापित करण्यासाठी परवानगी मिळेल अशी अट केंद्र सरकारने ठेवलेली दिसत नाही. अशी अट पूर्वी होती. आता नाही, याचे सरळ कारण असे असावे की परदेशातील विद्यापीठाचा दर्जा हा भारतातील विद्यापीठांच्या दर्जापेक्षा बराच उच्च असतो. आणि भारतातील विद्यापीठे अजूनही परदेशात जाऊन आपला कॅम्पस सेट अप करण्याच्या शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक मानसिक स्थितीपर्यंत पोहोचलेलेच नाहीत. यात अनेक. पैलू आहेत. विद्यापीठाचा दर्जा कुठल्या आधारे ठरवावा? कुणी ठरवावा ? नॅक चे मूल्यांकन चांगले म्हणजे कॉलेज चांगले असा गोड गैरसमज आहे. खरी परिस्थिती वेगळी असू शकते. शैक्षणिक संस्थांच्या मूल्यांकनासाठी माझ्या मते खालील निकष असावेत.

१. अभ्यासक्रम - हा किती अद्यावत आहे, आजच्या काळाशी किती सुसंगत आहे?
२. शैक्षणिक सुविधा - किती बिल्डींग्स आहेत, प्रयोगशाळा, वर्कशॉप्स, ग्रंथालये, कँटीन, होस्टेल्स, इतर सुविधा आहेत?
३. शैक्षणिक दर्जा - प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी किती शिकलेले, व्यावसायिक, मान्यताप्राप्त, स्वतंत्र व संस्थेशी / विद्यार्थ्यांप्रती किती एकनिष्ठ आहेत?
४.परीक्षा पद्धती - परीक्षा नक्की कुणाची होते व का होते? परीक्षेत मिळालेले मूल्यांकन हे विद्यार्थ्याने अथवा विद्यार्थिनीने शैक्षणिक चार वर्षात किती ज्ञान, अनुभव, कौशल्य मिळवले याचे वास्तव मूल्यांकन आहे का?
५.विद्यार्थ्यांचा दर्जा - किती विविध प्रकारचे विद्यार्थी विद्यार्थिनी संस्थेत शिक्षण घेतात? विद्यार्थी एकमेकांपासून काही चांगले शिकतात का, त्याचे एक शाश्वत नेटवर्क तयार होते आहे का?
६. इंडस्ट्री ॲकेडेमिया इंटरॲक्शन - संस्थेचे स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर किती इंडस्ट्रीशी करार आहेत, एकत्र काम करत आहेत, त्याचा ज्ञान, कौशल्य व अनुभव वाढीसाठी व अदान प्रदानासाठी काय उपयोग होतो आहे?

७.मूलभूत व उपयोग्य संशोधनासाठी वातावरण - संस्थेमध्ये संशोधनासाठी प्रोत्साहनपर व व्यावसायिक सपोर्ट, वातावरण, सुविधा व विख्यात संस्थांकडून मान्यता आहे का? फंडिंग मिळते आहे का?
८. नोकरीयोग्य शिक्षण - डिग्री घेतल्यानंतर किती जणांना, कुठे, कशी व किती पगाराची नोकरी मिळते ?
९. मान्यता - संस्थेमधून डिग्री घेतल्यानंतर त्या डिग्रीला जगभरात किती मान्यता आहे ?
१०. संस्थेची शाश्वत वाढ - संस्था शाश्वत रीतीने वाढते आहे का? गेल्या दशकात संस्थेची किती सर्वांगीण प्रगती झाली आहे व ती किती वर्ष टिकेल, यासाठी संस्थेकडे काही ठोस कार्यक्रम आहे का?
११. शिक्षणाचा विद्यार्थ्यांकरिता खर्च - संस्थेत शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांचा खर्च कमी करण्यासाठी संस्थेकडे काही शिष्यवृत्ती, पेड शैक्षिणक उमेदवारी, इतर काही योजना व उपक्रम आहेत का?
वरील एकादशसूत्री मूल्यांकन केवळ भारतीय माही तर परदेशी विद्यापीठांना, कॉलेजेसना व विद्यार्थ्यांना देखील लागू होते.
परदेशात शिक्षण घेणे हा एक वेगळा अनुभव असतो. ती एक संपूर्ण वेगळी संस्कृती व जीवनपद्धती असते. अशी संस्कृती भारतात निर्माण करता येईल का? तर याचे उत्तर नाही असे आहे. परदेशात मुले शिकायला जातात त्यावेळी अनेक देशातून त्या कॅम्पसमध्ये मुले मुली शिक्षणासाठी आलेली असतात. अशा तर्हेने एकप्रकारे आंतरराष्ट्रीय समुदायाबरोबर विद्यार्थ्यांना शिक्षण प्राप्त होतो. इथे मेरीटला महत्व येते. पेड असिस्टंटशिप, स्कॉलरशिप, अशा विविध प्रकारे मुलांना मुलींना आपल्या फीस व इतर खर्चाचा काही भाग स्वअर्जित करण्यासाठी संधी मिळते. यातून फार महत्वाचा अनुभवदेखील पदरात पडतो. परदेशात अभ्यासक्रम व कॅडमी क्रेडिट्स हे सतत अपग्रेड केले ज़ातात. आता अशी व्यवस्था भारतीय विद्यापीठ व कॉलेजेस मध्ये देखील नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत लागू होते आहे. फक्त डिग्री मिळवणे हा उद्देश न ठेवता त्या डिग्री बरोबर सुयोग्य ज्ञान, अनुभव, कौशल्य. विविधांगी व्यक्तिमत्व, विविध कलानैपुण्य, रिसर्चसाठी दिले जाणारे, सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे चांगली नोकरी मिळण्यासाठी साहाय्य अशा परदेशी विद्यापीठातून मधून शिक्षण घेऊन डिग्री घेतलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनीना मिळते. या सर्वांचा विचार करता भारतीय विद्यार्थी विद्यार्थीनी, भारतात राहून परदेशी विद्यापीठात खर्चिक शिक्षण घेण्यापेक्षा परदेशी विद्यापीठात परदेशात जाऊन शिक्षण घेणे जास्त पसंत करतील असे वाटते. अर्थात. यात आर्थिक भाग खूप मोठा आहे. म्हणजे फीज, राहण्याचा खर्च, वीजा, या सर्वांचा विचार करता परदेशात जाऊन शिक्षण घेणे खूप महागात. पडते. ज्या विद्यार्थी विद्यार्थिनींची आर्थिक कुवत परदेशात जाऊन परदेशी विद्यापीठात शिक्षण घेऊन घेण्याची नाही, त्यांच्यासाठी परदेशी विद्यापीठे भारतात कॅम्पस सेटअप करताय ही एक चांगली बातमी आहे.

या सर्व स्पर्धेत भारतीय विद्यापीठे, कॉलेज कुठे आहेत? असे दिसते की परदेशी विद्यापीठे भारतात आल्यानंतर सर्वच दृष्टिकोनातून स्पर्धात्मक वातावरण तयार होणार आहे. भारतातील विद्यापीठे आज पर्यंत आंतरराष्ट्रीय रँकिंग मध्ये फार कुठे दिसत नाहीत. परदेशी विद्यापीठे भारतात आल्यानंतर त्यांना अनुभवी चांगल्या दर्जाच्या प्राध्यापकांची, शिक्षकांची, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची गरज सर्वप्रथम लागणार आहे. महत्वाचा स्टाफ जरी त्यांनी आपल्याबरोबर आणला तरी इतर भारतीय विद्यापीठांमध्ये काम करणार्या स्थानिक प्राध्यापकांना, शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मागणी वाढणार आहे. यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेलच परंतु हा सगळा स्टाफ भारतीय विद्यापीठातून परदेशी विद्यापीठात गेल्यानंतर भारतीय विद्यापीठांना आपल्या पगारामध्ये, सोयीसुविधांमध्ये मोठी वाढ करावी लागणार आहे. या सर्वांचा आर्थिक बोजा विद्यार्थ्यांवर व पालकांवर पडणार आहे. मुळातच परदेशी विद्यापीठे भारतात नफा कमवण्यासाठी येताहेत हे निर्विवाद सत्य आहे.  त्यामुळे परदेशातील फीज व इतर खर्च या तुलनेत भारतातील कॅम्पसमधील फीज व इतर खर्च जरी कमी असला. तरी भारतीय विद्यापीठात शिक्षण घेण्याच्या खर्चापेक्षा निश्चितच अधिक असेल व कालांतराने भारतीय विद्यापीठातील फीज व इतर खर्च तसाच वाढण्याची शक्यता आहे. शिक्षणाचा मूलभूत अधिकार यामुळे डावलला जाण्याची शक्यता आहे. परदेशी विद्यापीठांचा अभ्यासक्रम हा आंतरराष्ट्रीय, शैक्षणिक, रिसर्च, प्लेसमेंट याचा विचार करून ठरवलेला असतो. भारतातील विद्यापीठांचा अभ्यासक्रम हा वर्षानुवर्ष तोच असल्यामुळे त्यातून डिग्री घेणारे विद्यार्थी विद्यार्थिनी हे रिसर्च व प्लेसमेंट च्या स्पर्धेत कमी पडतात. ही उणीव परदेशी विद्यापीठे भारतात आल्यानंतर कमी होण्याची शक्यता आहे. अर्थात असा अभ्यासक्रम सेट करण्यासाठी व राबवण्यासाठी यूजीसी अथवा केंद्र सरकारची परवानगी घेणे त्यांना कितपत आवश्यक आहे? याचा. खुलासा होणे आवश्यक आहे. आजही भारतातील अनेक नामवंत विद्यापीठे स्वतःला डीम्ड यूनिवर्सिटी, स्वायत्त विद्यापीठ म्हणून घोषित यासाठी आग्रह धरता आहेत. त्यामुळे त्यांना अभ्यासक्रम ठरवणे, राबवणे, विविध प्रकारच्या डिग्री देणे यामध्ये. स्वातंत्र्य मिळू शकते. यामुळे विद्यापीठांना अनेक प्रकारच्या कोर्सेस साठी विद्यार्थी प्रचंड प्रमाणात मिळत व त्यामुळे संस्थेच्या आर्थिक सुबत्तेत प्रचंड वाढ होते. आजमितीला हि आर्थिक सुबत्ता शिक्षक व शिक्षकेतर स्टाफपर्यंत फार पोहचू नाही, स्पर्धेमुळे ही परिस्थिती बदलेल.

मोठ्या कॅम्पससाठी लागणारी जमीन हे नवीन येणाऱ्या विद्यापीठांची एक मोठे आव्हान असेल. परदेशी विद्यापीठांना जमीन व बिल्डिंग सहजासहजी मिळण्याची शक्यता नाही. याचे कारण भारतीय विद्यापीठांचा कॅम्पस हा सरकारकडून कमी किमतीत

मिळालेल्या जमिनीमुळे, इतर सबसिडीमुळे व भारतीय संस्था वर्षानुवर्षे अस्तित्वात असल्यामुळे खूप मोठा झालेला आहे. याचा सरळ अर्थ नवीन कॅम्पस उभा करण्यासाठी परदेशी विद्यापीठांना जमीन विकत घ्यावी लागेल. म्हणजेच जमिनीचे भाव प्रचंड वाढण्याची शक्यता आहे. मुळातच अशी जमीन शहरात उपलब्ध नसल्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या भारतीय विद्यापीठांबरोबर करार करून कालांतराने अशा शैक्षणिक सुविधांचे विद्यापीठांचे परदेशी विद्यापीठामध्ये रूपांतर करणे हा एक पर्याय परदेशी विद्यापीठे अवलंबण्याची शक्यता आहे. यातून फायदा हा भारतीय संस्थाचालकांचा होणार आहे परंतु तोटा हा सरकारचा तसेच भारतीय विद्यार्थ्यांचा होणार आहे. परंतु परदेशी गुंतवणूक वाढेल. भारतातील विद्यार्थ्यांकडून मिळणारे फीज व इतर उत्पन्न परदेशी विद्यापीठे परदेशात घेऊन जाऊ शकतात. अर्थात आज ही भारतीय विद्यार्थी परदेशात जाऊन फीस भरतात त्यामुळे भारतातील उत्पन्न हे परदेशात जाण्याची प्रक्रिया सुरुच आहे. परंतु परदेशी विद्यापीठे भारतात आल्यानंतर परदेशात जाणारे उत्पन्न हे कैक पटीने वाढण्याची शक्यता आहे. याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

वाढत्या स्पर्धेमुळे काही कमकुवत भारतीय विद्यापीठे व संस्था कालांतराने बंद होऊन त्या ठिकाणी परदेशी विद्यापीठे स्थापन होण्याची शक्यता आहे. अथवा सकारात्मक विचार करता स्पर्धेमुळे भारतीय विद्यापीठे आपला दर्जा उंचावून अधिक चांगल्या प्रकारे शिक्षण देण्याचीही शक्यता आहे. यातील दुसरा पर्याय स्वीकारण्याची मानसिकता ही भारतीय विद्यापीठांकडे संस्थांकडे आहे का? हा कळीचा मुद्दा आहे. सद्यस्थितीत या भारतीय विद्यापीठांचे नियंत्रण व मालकी कुणाकडे आहे, याचे विश्लेषण करता असे लक्षात येते. बहुसंख्य खाजगी भारतीय विद्यापीठे हे राजकारणी, फॅमिली ट्रस्ट किंवा काही फॅमिली यांच्या मालकी व नियंत्रणाखाली आहेत. त्यामुळे प्रोफेशनल किंवा व्यावसायिक दृष्टिकोन ही विद्यापीठे चालवताना कमी पडतो. व्यावसायिक दृष्टिकोन हा केवळ आर्थिक फायदा या दृष्टिकोनातून न राहता शैक्षणिक गुणवत्ता सुधारणा, नोकरी मिळण्याची शाश्वती व संशोधनासाठी लागणारी सर्व मदत या प्रकारे अशा विद्यापीठातून व संस्थातून तयार झाल्यास तो विद्यार्थ्यांचा व पालकांचा फार मोठा फायदा असेल.

इंडस्ट्री अकॅडमिया. इंटरॅक्शन. परदेशी विद्यापीठे भारतात आल्यानंतर. वाढण्याची शक्यता आहे. कारण परदेशातील कंपन्या परदेशी विद्यापीठांच्या भारतीय कॅम्पस बरोबर सध्या अस्तित्वात असलेले करार वृद्धिंगत करून अथवा नवीन करार करून त्याद्वारे भारतीय विद्यार्थ्यांना भारतात प्लेसमेंट देण्याची शक्यता वाढणार आहे. यामुळे देखील भारतात परदेशी विद्यापीठात शिक्षण घेणार्या भारतीय विद्यार्थ्यांचा फायदा होण्याची शक्यता आहे. बहुतांशी परदेशी विद्यापीठ चार वर्षातील दोन वर्षे भारतात व दोन वर्षे परदेशात शिक्षण असा मार्ग अवलंबत, त्यामुळेही बहुसंख्य भारतीय विद्यार्थ्यांचा फायदाच होईल.

भारतातील परदेशी विद्यापीठात परदेशातून येऊन परदेशी विद्यार्थी शिक्षण घेणार का? हा अजून एक महत्वाचा मुद्दा आहे. असे झाल्यास. त्या कॅम्पसचे स्वरूप हे अधिक आंतरराष्ट्रीय होईल. तसेच परदेशातील प्राध्यापक व इतर स्टाफ हा भारतात येऊन जर काम करणार असेल तरीही अशा विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता, संस्कृती व  वातावरण हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे असेल. अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्राध्यापकांबरोबर, शिक्षकांबरोबर व शिक्षकेतर कर्मचार्यांबरोबर काम करण्यामुळे भारतीय प्राध्यापकांना, शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आंतरराष्ट्रीय अनुभवाचा, नंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याचा एक फार मोठा फायदा. होईल. यामुळे भारतातील अनेक शिक्षक. प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी कालांतराने परदेशी जाऊन परदेशी विद्यापीठात काम करणे सुरू करतील. या सर्व प्रक्रियेमुळे भारतीय शैक्षणिक क्षेत्र, त्याची गुणवत्ता व भारतातील विद्यापीठांचे परदेशातील मानांकन सुधारण्याची निर्माण झाली आहे.

यातील पुढील प्रगतीचा टप्पा म्हणजे भारतातील विद्यापीठे परदेशात जाऊन आपला कॅम्पस सेट अप करण्यासाठी सक्षम होतील. तसे झाल्यास भारतीय पद्धतीचा अभ्यासक्रम हा परदेशातील विद्यार्थ्यांना देखील परदेशात शिक्षण घेऊन अवलंबता येणार. आहे. त्यासाठी. भारतीय विद्यापीठाने. आतापासूनच कंबर कसून प्रचंड प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. निकोप स्पर्धेद्वारे या क्षेत्राची भरभराट व्हावी व त्यात पालकांचा, विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा फायदा व्हावा.

**© Dr. Sandeep Kadwe, Incubate Partners, Pune.**
**Ph: 9860678844      Email: dr@in3bet.com**
**www.in3bet.com**

# Petition to recognize contributions of Indian Tax Payers, Voters, NRIs

यह याचिका विश्व पांथस्थ द्वारा २७ फरवरी २०२३ को भारत के माननीय राष्ट्रपति और भारत के माननीय प्रधान मंत्री के कार्यालय में प्रस्तुत की गई थी, जिसके बाद १ जुलाई, २०२३ को एक अनुस्मारक और परिशिष्ट भेजा गया था। हमें आज तक इस याचिका के लिए कोई प्रतिक्रिया नहीं मिली है हालाँकि, हमारा मानना है कि संबंधित कार्यालयों ने इस याचिका पर ध्यान दिया है। हमारे पाठकों, भारतीय करदाताओं, मतदाताओं और एनआरआई के लाभ के लिएपुन:प्रस्तुत।

**Honorable Prime Minister,**

1. India being democratic republic, participation of common citizen in general elections and elections at all levels, where state and local government representatives are elected, is very important. The day of voting is always the day when "voters" win, preserving the democracy of India, no matter which "candidate" gets majority votes. However, beyond the elections, voters have no role and control over the elected representatives, their deeds and actions. It's sad, after the voting day, till next voting day, voters seem to lose, disheartening them, due to unethical and undemocratic actions of many elected representatives. Probably this is the reason why voting percentage is sliding and participation of common citizen in elections is dwindling. In this petition I am making a suggestion to recognize the participation of common citizen as voters in the elections.

2. Government of India is also trying to increase the tax revenue through various measures and schemes. Again, after paying taxes in various forms, it is observed that, the honest tax payers have no control over the way the honest tax payers contribution is spent. It is so disheartening for the common citizen to see his hard earned money sometimes spent on unproductive and unreasonable projects and activities. The honest tax payer does not even know, how much is his or her gross tax contribution in a year, since common citizen is paying many other taxes beyond Income Tax. Infact, people who are not paying income tax are also paying several other direct and indirect taxes and contributing in their own capacity as buyers of products and services, users of government and public services as honest citizen of this country. It is necessary to present true picture of gross tax contribution made by each citizen. This is now possible due technology, since every legal transaction is captured by the banking system, if payments are made through banking and online digital payments channels. All such income and expenditures, if made through digital and banking channels, have an audit trail to PAN of each citizen. This information or data, is already available with the government, directly or through banking / fintech channels. Using such IT capabilities, proper classification, presentation and grading of this data is absolutely possible, in the interest of analyzing and recognizing the social and economic contributions made by each Indian Citizen.

3. It would help, if social and economic contributions of each Indian Citizen are measured, analysed, graded and eventually recognized in order to increase their participation for further strengthening this country. In this context, I sincerely and humbly make following requests to Government of India:

    3.1. Government of India shall provide detailed report to every Indian Citizen holding PAN, how much tax, he or she, pays, not only income tax, but all taxes, including, GST, STT, Cess, Toll, Surcharge, various government fees, etc. This would be similar to form 26AS, but it would include all taxes paid, including GST paid on purchases. This comprehensive statement would show Gross Tax paid by any citizen, holding PAN, under his/her own PAN. The top 5,00,000 gross tax payers shall be given "Privileged Citizen of India" status, should have priority access to all government departments and establishments. Government can also think creatively to incentivize their gross tax contributions. This list shall include all elected representatives, all government servants, all NRIs and shall not exclude any Indian Citizen.

3.2. Voting is a fundamental right of every eligible Indian citizen, however, almost half of eligible Indian population does not vote in elections. This percentage shall increase in order to preserve Indian democracy. Government of India shall use technological solutions to provide voting access to migrant workers, NRIs and people who are posted away from their registered constituency. Further, in order to incentivize and recognize the efforts of the voters, Government of India shall find, using the data available with the Election Commission, those voters who vote during any two successive elections in a term and they shall be given "Responsible Citizen of India" status. If they make more the voting attempts, their ranking shall be higher.

3.3. Like voting, contesting an election is also the fundamental right of every eligible citizen. In order to recognize the courage and efforts of such Indian Citizen, who contest various elections, Government of India through data available with Election Commission shall find those Indian, who contest elections, (including Independent Candidates) and who are able to get more than 500 votes in any election. Further, as a recognition to their efforts, they shall be declared as "Democratic Leaders of India". If they manage to receive more the aggregate votes, their ranking shall be higher in that category.

3.4. Fourth parameter of ranking shall be, Indians who provide direct employment to maximum number of Indians, including employment to unorganized sector workers. This may be a bit complex parameter to measure, since many times, payments to unorganized sector workers is in cash. Suitable checks and balances can be built to measure this parameter. This ranking may include individuals, proprietorship, partnership companies, may or may not include public or private limited companies, section 8 companies or NGOs. However, all government servants, officers, MPs, MLAs, Corporators, commissioned officers, who get their salaries, honorarium, perks and benefits from taxpayers money, shall be excluded from this list. Elected representatives, if they renounce their salary/ honorarium and perks, may be considered eligible for this honor.

3.5. The combined ranking of all four rankings above, shall be declared by the government publically and top 11,000 citizens shall be felicitated as "Pillars of Indian Democracy and Economy", every year. They shall be appointed on key posts with decision making powers, sans any salary or honorarium.

3.6 We call migrants within the country as Panthastha and NRIs as Vishwa Panthastha. NRIs in most cases are not tax payers in India and are also not able to exercise their voting rights due to remote locations. However, NRIs are sending remittances to India and contributing in a big way to support Indian economy. To recognize their contribution through remittances, NRIs shall also be ranked based on their remittances to India every year and top 1,000 NRIs shall be felicitated with “Distinguished Pravasi Bhartiya” award every year.

4. We as citizen of India, are paying Income tax and Expenditure tax, both. The combined incidence of this taxation is very high, besides the impact of inflation. It is possible to provide relief to honest tax payers, by recognizing their contributions through indirect taxes, on the same basis as GST paid by businesses. This tax contribution through expenditure can be captured through PAN of each PAN holder, as mentioned above (similar to form 26AS) and a minimum deduction of INR 2,00,000 shall be provided in filing the Income Tax returns for each financial year, on and above the current IT provisions.

I sincerely hope you will find this petition and above suggestions useful. I humbly request you to consider these suggestions favorably and direct the concerned Ministries of Government of India to do the needful.

Addendum to Petition – dtd. 1st July, 2023.

5. Further to the Petition submitted to your August office, I wish to bring to your notice a very serious inconsistency and anomaly in GST Refunds, in operation since the application and implementation of the GST across India.

6. I quote here an example to explain my point.
Consumer A – Buys a product by paying GST of 18%, say INR 1,800. (Does not have GST number, hence not entitled for input credit, hence this is a net outflow of money from Consumer A to the Government, through the Seller)
Seller A – Collects 18% GST from the Consumer A, deposits this amount of 18% say Rs 1,800 to the Government. Further, the Seller, having GST number, claims Input Tax Credit, since he is entitled to get such refund, and gets a refund of INR 1,800 or 18%.
Inconsistency: Seller A is getting net surplus of 18% without paying for it, since the actual payer of the tax is Consumer. Hence, the refund should have been made to the Consumer, through Seller A or directly, using the PAN Number of the Consumer.

7. In above case, it is clear that all sellers or producers or service providers, who are collecting GST from Consumers, are actually claiming GST refund as Input Tax Credit, while this amount is NOT paid by them. This is Free Money for them. Yes. They could have paid the GST on raw material purchase etc, but that is submitted to the government by the Raw Material seller (Seller B in this case) to the Government. The GST collected by Seller A is not paid from his pocket. GST Paid by Seller A to Seller B shall be set off by Seller B to Seller A, since Seller B is also claiming Input Tax Credit from government against Tax collected from supplier say Seller C, unless supplier C does not have the GST number. In most cases, Supplier C is either farmer, small trader manufacturer or individual not having GST number. So the actual refund shall be made to the last person in this chain, not to the intermediary, who is holding surplus money, not actually paid by him/her. The actual right of refund is that of Consumer or Supplier at the end of the chain. (Actually not holding the GST number, hence not entitled for the GST refund). We request, Government shall use PAN number of such customers to enable refunds to the individual in this case.

I sincerely hope you will find this petition dtd 28th June 2023, which is addendum to the original petition submitted on 27th Feb, 2023 to office of Hon President and Hon Prime Minister of India and above suggestions useful. I humbly request you to consider these suggestions favorably and direct the concerned Ministries of Government of India to do the needful.

**- Dr Sandeep Kadwe,**
**Editor, Vishwa Panthastha, Pune.**

Best Compliments from

in3bet
Incubate Partners
Innovate Incubate Invest Build Expand Transform

Mentoring and Incubation Support

www.in3bet.com | mentor@in3bet.com | Mobile - +91 9860678844 (WA)

Vishwa Panthastha CR No. MAHBIL/2018/69261



## Sandalwood
(Chandan) 190+ Trees



## Mango
150+ Trees




**Agriculture Plot**
Winwin Innfra & Agro Pvt. Ltd.

100%
Table Plot

₹36sq.ft

Book now

WINWIN

# EMI Available +91 77778 84481

Visit Office - Gera's Imperium Alpha, Kharadi.